जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

26 FEB 2022 क्रांतीसिंह

# अधिक संपत्ती संचयातून गरीब-श्रीमंत दरीत वाढ:डॉ.भोईटे



कोल्हापूर (प्रतिनिधी):- भांडवलशाहीच्या रेट्यात अधिकाधिक संपत्तीसंचयाच्या हव्यासातून जगात गरीब-श्रीमंत अशी दरी वाढते आहे, असमानतेला खतपाणी घालते आहे, असे प्रतिपादन भारती विद्यापीठ तसेच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्या पीठाचे माजी कुलगुरू डॉ. उत्तमराव भोईटे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या वतीने 'असमानता आणि दारिद्र्य' (Inequality and Poverty) या पुस्तकाच्या ऑनलाईन प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुल गुरू डॉ.डी.टी.शिर्के अध्यक्ष स्थानी होते. डॉ. भोईटे म्हणाले, दारिद्र्य आणि अस मानता या अनुषंगाने प्राचीन काळापासून चर्चा होतच आली आहे. महा भारत असो की कालिदासाचे मृच्छकटिक, प्राचीन वाङ्मयातही त्यांचे दाखले आढळतात. मानवी जगण्यासमोरची ही दोन मोठी आव्हाने आणि अविभाज्य घटक आहेत. दारिद्र्याचे दशावताराही अनेक स्वरुपाचे आढळतात. आपण एकावर उपाय शोधला की त्याचा नवा प्रकार सामोरा येतो. असे निरंतर सुरू आहे. लोक गरीबीसह जगणे स्वीकारतात. त्यांच्याहून अधिक भौतिक स्थितीतील लोकांच्या संपर्कात आल्यानंतर त्यांच्यात आपल्या गरीबीच्या जाणीवा निर्माण होतात. पूर्वी धट्टीकट्टी गरीबी, लुळीपांगळी श्रीमंती या ब्रीदाचा समाजाच्या राहणीमानावर वर चष्मा होता. आता भांडवल शाहीच्या रेट्यात मात्र अधिका धिक संपत्ती जमा करण्याचा हव्यास घातक ठरतो आहे. ही बाब सर्वांनाच साधत नाही आणि समाजातील आर्थिक दरी अधिकाधिक रुंदावतेच आहे. हे खेदजनक आहे. मात्र, या अनुषंगाने समाजशास्त्रज्ञांनी, अर्थशास्त्रज्ञांनी आपापल्या परीने उपाययोजना शोधत राहणेही समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. डॉ. कराडे आणि डॉ. पाटील यांनी सदर संपादित पुस्तकाच्या माध्यमातून त्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकलेले आहे, असे गौरवोद्गारही त्यांनी काढले. अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, जगातील दारिद्र्य आणि असमानता यांवर मात करण्याची अगर त्या अनुषंगाने संशोधन करण्याची जबाबदारी ही केवळ काही ठराविक अभ्यास क्षेत्रांची अथवा संशोधकांचीच आहे, असे नव्हे; तर, प्रत्येक समाजघटकाचे त्यासाठी काही उत्तरदायित्व आहे, याची सर्वदूर जाणीव निर्माण होणे ही आजची खरी गरज आहे. जगातील सामाजिक-आर्थिक असमानता दूर होऊन संपत्तीचे सर्व घटकांत समन्यायी वितरण होण्याच्या दृष्टीने परिवर्तन होण्याची गरज असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरवातीला डॉ. जगन कराडे आणि डॉ. राजेंद्र पाटील यांनी संपादित केलेल्या 'असमानता आणि दारिद्र्य' या पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर पुस्तकाच्या अनुषंगाने झालेल्या परिसंवादात राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञ मान्यवरांनी सहभाग घेतला. यामध्ये डॉ. विद्युत जोशी(गुजरात),डॉ.आर. इंदिरा (कर्नाटक), डॉ. आनंद कुमार (गोवा),डॉ.वेन्केटेश्वरलु (आंध्र प्रदेश), डॉ. एस. गुरुस्वामी (तमिळनाडू), डॉ. अरविंदर अन्सारी (नवी दिल्ली), डॉ. बिस्वजीत घोष (पश्चिम बंगाल), डॉ. नागराजू गुंडेमेडा (हैदराबाद) यांनी आपली मते नोंदविली. यावेळी नवी दिल्ली येथील रावत प्रकाशनाच्या प्रणित रावत यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. अविनाश भाले यांनी आभार मानले.

2 6 FEB 2022 **लोकमत** जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापुरात शुक्रवारी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाच्या अकराव्या अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शेजारी डावीकडून प्रकाश दुकळे, रघुनाथ कैंगार, के. जी. पाटील, अनिल गवळी, व्ही. एम. पाटील आदी उपस्थित होते.

# साहित्यामध्ये सकारात्मक बदल करण्याची ताकद

## डी. टी. शिर्के : आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : साहित्य भावनांचे, अभिव्यक्तीचे सशक्त माध्यम आहे. समाजामध्ये संवेदनशीलता निर्माण करण्याचे कार्य साहित्य करत असते. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रांमध्ये सकारात्मक बदल करण्याची ताकद साहित्यामध्ये आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी शुक्रवारी येथे केले.

येथील न्यू कॉलेज आणि शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघातर्फे आयोजित आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र व शिक्षक संघाच्या अकराव्या वार्षिक अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. अनिल गवळी होते. श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाउसचे अध्यक्ष के. जी. पाटील यांच्या हस्ते 'सन १९९० नंतरची मराठी कादंबरी' याविषयावरील चर्चासत्राचे उद्घाटन झाले.

पत्रकारिता, प्रसारमाध्यमे, मनोरंजन क्षेत्रामध्ये मराठी भाषेत अनन्यसाधारण महत्त्व आहे. साहित्याच्या माध्यमातून मानवी नातेसंबंधांचे विविध पैलू समोर येतात. त्यामध्ये कादंबरी हा लोकप्रिय साहित्य प्रकार असल्याचे पाटील यांनी सांगितले. कार्यक्रमास डॉ. रघुनाथ कैंगार, दत्ता पाटील, शिवकुमार सोनाळकर, जी. पी. माळी, रमेश साळुंखे, जी. आर. पाटील आदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी स्वागत केले. मराठी शिक्षक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश दुकळे यांनी संघाच्या वाटचालीचा आढावा मांडला. उपप्राचार्य डॉ. ए. एम. शेख यांनी आभार मानले.

### नवांगुळ, गुरव यांचा सत्कार

या कार्यक्रमात साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त सोनाली नवांगुळ, किरण गुरव यांचा सत्कार करण्यात आला. मराठी शिक्षक संघाने घेतलेल्या विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण, गुणवंत विद्यार्थी सत्कार, ललित व ललितेतर संपादन साहित्य प्रकारातील ग्रंथ पुरस्कार, गुणवंत शिक्षक पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

पुढारी

# वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासणे आवश्यक : डॉ. व्ही. एन. शिंदे

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन नष्ट होत आहे. हा वैज्ञानिक दृष्टिकोन त्यांच्यामध्ये निर्माण करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन प्रभारी कुलसचिव डॉ.व्ही.एन.शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. 'आजादी का अमृत महोत्सवा'चे औचित्य साधून डीएसटी-स्तुती कार्यक्रमांतर्गत २८ फेब्रुवारीपर्यंत विज्ञान जागृती सप्ताहाचे आयोजन केले आहे. डॉ. शिंदे म्हणाले, विद्यार्थ्याला वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विज्ञान शिकण्याची आवड असणे महत्त्वाचे आहे. विज्ञानाच्या विविध संकल्पना समजून घेतल्यास यासारखा सोपा विषय नाही. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी पाटील यांनी केले. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी आभार मानले.

पुढारी

# विद्यापीठाकडून १० हिवाळी सत्र परीक्षांचे निकाल घोषित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने हिवाळी सत्र परीक्षेंतर्गत आजअखेर दहा परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. बॅचलर ऑफ इंटिरिअर डिझाईन सत्र-१, बीए-डिफेन्स स्टडीज : सत्र-१ व २, बी.व्होक. हॉर्टीक्लचर सायन्स अँड टेक्नॉलॉजी- सत्र : १ व २, बी. व्होक. नर्सिंग आदी विषयांचे निकाल जाहीर झाले आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची शनिवारी (दि. २६) परीक्षा आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या सर्व परीक्षा रविवारी (दि. २७) नियोजित वेळापत्रकाप्रमाणे घेण्यात येणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी सांगितले.

पुण्यनगरी

# साहित्य अभिव्यक्तीचे सशक्त माध्यम

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : न्यू कॉलेजमध्ये राष्ट्रीय चर्चासत्र



**कोल्हापूर : न्यू कॉलेज आणि शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने '१९९० नंतरची मराठी कादंबरी' या विषयावरील चर्चासत्र व शिविमचे अकरावे वार्षिक अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के सोबत मान्यवर.**

कोल्हापूर : प्रतिनिधी

समाजामध्ये संवेदनशीलता निर्माण करण्याचे कार्य साहित्य करत असते. भाषेमुळे भावना व शब्दसंग्रह समृद्ध होत असतो. साहित्य भावनांचे अभिव्यक्तीचे सशक्त माध्यम आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. ते प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संचलित न्यू कॉलेज आणि शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने १९९० नंतरची मराठी कादंबरी या विषयावर आयोजित दोन दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र व शिविमचे अकराव्या वार्षिक अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या चर्चासत्राचे उद्घाटन श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन के. जी. पाटील यांच्या हस्ते झाले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, १९९० नंतरच्या जागतिकीकरणामुळे मराठी भाषेस व्यापक संधी निर्माण झाल्या आहेत.

चेअरमन के. जी. पाटील म्हणाले, पत्रकारिता, प्रसारमाध्यमे व मनोरंजन क्षेत्रामध्ये मराठी भाषेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. साहित्याच्या माध्यमातून मानवी नातेसंबंधांचे विविध पैलू समोर येतात.

प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रकाश दुकळे यांनी वाटचालीचा आढावा घेतला. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त सोनाली नवांगुळ व किरण गुरव यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास रघुनाथ केंगार, दत्ता पाटील, शिवकुमार सोनाळकर, प्राचार्य जी. पी. माळी, रमेश साळुंखे चर्चासत्राचे समन्वयक प्रा. जी. आर. पाटील आदी उपस्थित होते. उपप्राचार्य ए. एम. शेख यांनी आभार मानले.

26 FEB 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# साहित्याचे काम संवेदनशीलता निर्मितीचे

## कुलगुरू डॉ. शिर्के ; 'शिविम' च्या ११ व्या वार्षिक अधिवेशनाचे उद्‍घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २५ : ''समाजात संवेदनशीलता निर्माण करण्याचे कार्य साहित्य करत असते. भाषेमुळे भावना व शब्दसंग्रह समृद्ध होत असतो. साहित्य भावनांच्या अभिव्यक्तीचे सशक्त माध्यम आहे. तसेच आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रामध्ये सकारात्मक बदल करण्याची ताकद साहित्यात आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.



**कोल्हापूर : न्यू कॉलेज व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाच्या दोन दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्रात बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.**

प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संचालित न्यू कॉलेज व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाच्या संयुक्त विद्यमाने '१९९० नंतरची मराठी कादंबरी' विषयावरील आयोजित दोन दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र व शिक्षक संघाच्या अकराव्या वार्षिक अधिवेशनाच्या उद्‍घाटनप्रसंगी ते बोलत होते. बोर्डिंग हाऊसचे चेअरमन के. जी. पाटील यांच्या हस्ते उद्‍घाटन झाले. प्रा. डॉ. अनिल गवळी अध्यक्षस्थानी होते. कॉलेजच्या सभागृहात आयोजन केले आहे.

डॉ. शिर्के म्हणाले, ''पत्रकारिता, प्रसार माध्यमे व मनोरंजन क्षेत्रात मराठी भाषेला अनन्यसाधारण महत्त्व असून, साहित्याच्या माध्यमातून मानवी नातेसंबंधांचे विविध पैलू समोर येतात. यामध्ये समाजजीवनावर प्रभाव टाकणारा कादंबरी हा लोकप्रिय साहित्य प्रकार आहे.''

याप्रसंगी साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त सोनाली नवांगुळ व किरण गुरव यांचा सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. व्ही.एम. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रकाश दुकळे यांनी मराठी संघाच्या वाटचालीचा आढावा घेतला.

डॉ. रघुनाथ केंगार, दत्ता पाटील, डॉ. शिंदे-गोडसे, प्रा. डॉ. शिवकुमार सोनाळकर, प्राचार्य डॉ. जी. पी. माळी, डॉ. रमेश साळुंखे, प्रा. जी. आर. पाटील उपस्थित होते. उपप्राचार्य डॉ. ए. एम. शेख यांनी आभार मानले.

सकाळ



**हिंदी विभागातील भाग दोनमधून गुणवत्ता यादीत आलेल्या अजय कांबळे व ज्योती बुद्ध्याळकर यांना मेधावी छात्र सन्मान पुरस्काराने सन्मानित करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, रोविन सिंग, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.**

# कांबळे, बुद्ध्याळकर यांचा गौरव

**उचगाव** : हिंदी भाषा रोजगाराचे महत्त्वपूर्ण साधन आहे, असे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले. बँक ऑफ बडोदा कोल्हापूरतर्फे शिवाजी विद्यापीठ अंतर्गत हिंदी विभागातील भाग दोनमधून गुणवत्तेत आलेले अजय कांबळे व ज्योती बुद्ध्याळकर यांना मेधावी छात्र सन्मान पुरस्कार देण्यात आला, त्या वेळी ते बोलत होते. त्यांच्याच हस्ते अजयला ११ हजार, तर ज्योतीला सात हजार ५०० रुपये व प्रमाणपत्र देण्यात आले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, बँकेतर्फे राजभाषा अधिकारी रोविन सिंग, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते. हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. ए. एम. सरवदे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. चंदा सोनकर यांनी आभार मानले.

सकाळ

# संशोधनातील सर्व क्षेत्रात गणित गरजेचे : डॉ. मद्वाना

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २५ : 'ग्रामीण विद्यार्थ्यांनी भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेसह किशोर विज्ञान प्रोत्साहन योजनेसाठी प्रयत्न करावेत. संशोधनातील सर्व क्षेत्रांत गणित गरजेचे असल्याने उच्च माध्यमिक शिक्षणादरम्यान हा विषय सोडू नये,' असे प्रतिपादन डॉ. दयानंद कॉलेजचे डॉ. मोहन मद्वाना यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आयोजित विज्ञान जागृती सप्ताहात ते बोलत होते. यावेळी रसायनशास्त्र विभागाचे प्रा. एस. डी. देळेकर व एसएआयएफ-डीएसटी केंद्राचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे उपस्थित होते.

प्रा. मद्वाना यांनी सोलापूरचे समीर मित्रगोत्री, भारतीय नौदलातील संशोधन सहाय्यक भाग्य स्वामी, डीआरडीओच्या क्षेपणास्त्रांना सोल कोटिंग करून देणारे संदीप सोले यांची उदाहरणे सांगितली. वैज्ञानिक संकल्पना मराठीमध्ये समजून घेण्यासाठी 'मराठी विश्वकोश मोबाईल ॲप' वापराचा सल्ला त्यांनी दिला.

सप्ताहादरम्यान गुरुवर्य गुरुनाथ विठ्ठल पाटील ज्युनियर कॉलेज (हलकर्णी) व श्रीमान व्ही. पी. देसाई ज्युनिअर कॉलेज (कोवाड, ता. चंदगड) येथील शंभर विद्यार्थ्यांनी विद्यापीठाला भेट दिली. त्यांना संजय घोडावत विद्यापीठाच्या प्रा. डॉ. एस. आर. पाटील व शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाचे प्रा. डॉ. प्रमोद वासंबेकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र व शालोपयोगी साहित्याचे वाटप केले. यावेळी प्रा. एस. डी. देळेकर यांनी मनोगत व्यक्त केले. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. के. व्ही. मोरे यांनी आभार मानले.

26 FEB 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थी हित अन् रोजगार निर्मितीला प्राधान्य

## पाच वर्षात विद्यापीठ अधिकार मंडळाचे स्वागतार्ह निर्णय

- **अधिसभा सदस्यांची ११ मार्च रोजी होणारी अधिसभा पंचवार्षिकमधील अखेरची ठरणार**

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील विद्यमान अधिसभा सदस्यांचा कालावधी ऑगस्ट महिन्यात संपणार आहे. त्यांच्या कालावधीत प्रत्येक अधिकार मंडळाने समन्वय ठेवून, शैक्षणिक वातावरण ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळेच विद्यापीठातील शिक्षक, संशोधकांना जागतिक स्तरावरील संशोधनाचे मानांकन मिळाले आहे. कौशल्यावर आधारित नवनवीन अभ्यासक्रम सुरू करून रोजगार निर्मिती वाढवली जाणार आहे. सभागृहातील काही अधिसभा सदस्यांच्या गोंधळामुळे विद्यापीठ अंतर्गत राजकारण मोडीत काढू शकले नाहीत, ही खंत विद्यापीठ वर्तुळातून व्यक्त होत आहे.

शिवाजी विद्यापीठाची अधिसभा ११ मार्च रोजी होणार आहे. या पार्श्वभूमीवर मिनी सभा घेऊन वेगळा पायंडा पाडला आहे. कारण ही अधिसभा संबंधित सदस्यांची शेवटची असेल. त्यानंतर ऑगस्ट २०२२ ला निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे. यंदा या सभेपूर्वी प्री बजेट बैठक घेतली. या बैठकीत अधिसभा सदस्यांनी सभेपूर्वीच काही सूचना केल्या आहेत. त्यामुळे मार्चमध्ये होणारी अधिसभा वादळी असणार की नाही? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**बृहत आराखड्यानुसार महाविद्यालयांना सुविधा देणार**

विद्यापीठातील प्रत्येक अधिकार मंडळाने विद्यार्थी, कर्मचारी, प्राध्यापकांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले. नवनवीन अभ्यासक्रम, महाविद्यालये सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन दिले आहे, परंतू अत्याधुनिक क्रीडा सुविधा देण्यासाठी शासन स्तरावर अनुदानासाठी पाठपुराव सुरू आहे. बृहत आराखड्यानुसार महाविद्यालयांना शैक्षणिक सुविधा देण्याचा प्रयत्न सुरू आहेत.

**- ॲड. धैर्यशील पाटील (अधिसभा सदस्य)**

शिवाजी विद्यापीठाला मिळालेले नॅकचे 'ए प्लस' मानांकन विद्यापीठ अधिकार मंडळांचे सर्वात मोठे यश मानले जाते. अधिसभा सदस्यांसह सर्वच अधिकार मंडळांनी विद्यार्थी हिताचे निर्णय घेतले आहेत. यामध्ये नदी काठाजवळील कॉलेजला बोटिंग स्पर्धेसाठी पूरक साहित्य पुरवणे, विद्यापीठातील लॅब उद्योजकांना वापरासाठी खुली करणे, विद्यार्थी अपघात विमा योजनेच्या रक्कमेत ७५ हजारांची वाढ केली आहे. आर्थिकदृष्ट्या कमकुवत महाविद्यालयांनी १ लाख रूपये अनुदान, कोल्हापुरातील चित्रपटसृष्टीला पूर्वीचे दिवस आणण्यासाठी चित्रपट निर्मिती अभ्यासक्रम, नवीन शोध लावणाऱ्या नवसंशोधकांना इनोव्हेशनव्दारे प्रोत्साहन देणे, रोजगाराभिमुख अभ्यासक्रम तयार करणे, छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्र, शारदाबाई पवार अध्यासन, कला, सांस्कृतिक केंद्र उभारणीत यश आले.



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आणखी एक नवीन वसतिगृह प्रस्तावित आहे. सीमा भागातील विद्यार्थ्यांना गडहिंग्लज येथे उपकेंद्र सुरू केले आहे. या अधिसभा सदस्यांची दोन वर्षे कोरोनामध्ये गेली असली तरी चांगले निर्णय घेतले.

**खेळाडूंना प्रोत्साहन**

विद्यापीठ अंतर्गत खेळाडूंना चालना देण्यासाठी आणि मिशन ऑलंपिक डोळ्यासमोर ठेवून जिमखाना हॉल परिसरात स्पोर्टस् कॉम्प्लेक्स तयार केले. अत्याधुनिक शुटींग रेंज, बॅडमिंटनचे चार कोर्ट, टेबल टेनिसचे चार कोर्ट, मल्टी जीम, खेळाडूंचा भत्ता दोनवेळा वाढवला, खेळाडूंच्या टीएडीएमध्ये वाढ, खेळाडूंना शिष्यवृत्ती देण्यास परवानगी, ग्रेस गुण देण्याचा निर्णय झाला. यासह विद्यापीठ अंतर्गत खेळाडूंना चालना देणारे स्वागतार्ह निर्णय घेतले आहेत.

**प्राध्यापक व प्रशासकीय अधिकाऱ्यांतील अंतर्गत वाद मिटवण्यात अपयश**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत प्राध्यापक व प्रशासकीय अधिकाऱ्यांचे वाद वारंवार चव्हाट्यावर येतात. परंतू त्यांचे वाद मिटवण्यास अधिसभा सदस्यांना अपयश आले. उर्वरीत दिवसात अंतर्गत वाद बाजूला ठेवून विद्यार्थी हिताची कामे करण्यास त्यांनी प्राधान्य द्यावे. यासाठी अधिसभा सदस्यांनी एखादा ठराव करण्याची गरज असल्याची चर्चा शिक्षण वर्तुळात आहे.

**अधिसभेतला गोंधळ थांबवून शैक्षणिक निर्णय घ्यावे**

अधिसभा म्हटली की वादळी होणारच, असे समीकरण झाले आहे. सत्ताधारी आणि विरोधक दोघेही विद्यार्थी हिताचेच प्रश्न उपस्थित करतात. मग विरोधाला विरोध म्हणून अधिसभेत गोंधळ करायचा, सभात्याग करायचा ही प्रथा कोठेतरी थांबण्याची गरज आहे. कारण मतदारांनी ज्या अपेक्षेने निवडून दिले आहे, त्या अपेक्षांचा भंग होत असून अंतर्गत राजकारणासाठी विद्यार्थीहित बाजूला राहते.

तरुण भारत

# 'साहित्य भावनांच्या अभिव्यक्तिचे माध्यम'

**कोल्हापूर :** समाजामध्ये संवेदनशील निर्माण करण्याचे कार्य साहित्य करत असते. साहित्य भावनांच्या अभिव्यक्तीचे सशक्त माध्यम आहे, असे प्रतिपादन कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाउस संचलित न्यू कॉलेज, कोल्हापूर आणि शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमानाने १९९० नंतरची मराठी कादंबरी या विषयावर आयोजीत आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये ते बोलत होते.

तरुण भारत

# 'हिंदी भाषा रोजगाराचे साधन'

**कोल्हापूर :** हिंदी भाषा ही बोलण्यास जरी कठिण आहे. तरीही युवा पीढीसाठी ती रोजगाराचे महत्त्वपूर्ण साधन बनली आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. गृहमंत्रालय भारत सरकारतर्फे राजभाषा हिंदी प्रचार व प्रसार कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. बँक ऑफ बडौदा कोल्हापूरतर्फे शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागाच्या भाग दोनमधील गुणवत्ता यादीतील दोन विद्यार्थ्यांना दर वर्षी 'मेधावी छात्र सम्मान पुरस्कार' दिला जातो. यंदा पुरस्काराचे प्रथम मानकरी अजय कांबळे यांना प्रशस्तीपत्रक व अकरा हजार रूपये तर व्दितीय मानकरी ज्योति बुध्याळकर यांना प्रमाणपत्र देऊन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते सन्मानित केले.